O/C


राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय, पुणे - १

डॉ. पी. एस. पवार
एम.एस.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५९५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
crs_d83@yahoo.com
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१


जा.क्र. आमाजीआ/कक्ष-८३/जमृनों-अनुपप्र/8875-8950 /१३, दिनांकः- 7 ऑगस्ट २०१३

**परिपत्रक**

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु
जिल्हा परिषद .....................(सर्व)

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा
निबंधक, जन्म व मृत्यु, परळ,बृहन्मुंबई महानगरपालिका,

३) आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु
महानगरपालिका,...................(सर्व)

४) कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्ड तथा
निबंधक, जन्म व मृत्यु,............(सर्व)

५) प्रशासक ॲम्युनिशन फॅक्टरी तथा
निबंधक, जन्म व मृत्यु,...........(सर्व)

विषय :- जन्म मृत्यु नोंदणी
अनुपलब्धता प्रमाणपत्र देणेबाबत. (Non Availability Certificate)

संदर्भ :- १) मा. अतिरिक्त सचिव तथा महानिबंधक, जन्म व मृत्यु, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्लीकडील इंग्रजी पत्र No.1/10/2004-VS(CRS), दि. ३१ जानेवारी, २००७

२) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य,मुंबईकडील इंग्रजी पत्र No. DHS/B&D/ Non availability certi/D-18/07, दि. ९ फेब्रुवारी २००७

३) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. आमाजीआ/कक्ष-८३/जमृनों-अनुपप्र/२४९७-५७२/०७, दिनांकः- २१ फेब्रुवारी, २००७

४) मा. महानिबंधक, भारत सरकार यांचे पत्र क्र.No.1/7/2012-VS-CRS Dated 5.6.2013

मा. महानिबंधक, जन्म व मृत्यु, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांनी जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ३(३) च्या अधिनतेने, जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम २००० मधील नियम १३(३) नुसार, जन्म व मृत्यु घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यु यांनी

SO
File

द्यावयाच्या अनुपलब्धता प्रमाणपत्रा संबंधीच्या मार्गदर्शनपर सूचना संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकानुसार आपणांस पाठविण्यात आल्या होत्या. सदर परिपत्रकातील सुचना पुनश्चः पाठविण्यात येत आहेत. त्याप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व निबंधकांना परिपत्रका व्दारे सुचना देण्यात याव्यात व त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

कृपया सदर परिपत्रकातील, जन्म व मृत्यु नोंदणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे बाबत मार्गदर्शक सूचनांचा काटेकारेपणे अवलंब करण्यात यावा.

जन्म व मृत्यु घटनेच्या नोंदणीसंबंधी अर्जदारांना जो अनुपलब्धता प्रमाणपत्र निबंधक, जन्म व मृत्यु यांच्याकडून दिला जातो, त्यावेळी निबंधकांनी खाली नमूद बाबी संबंधी माहिती घ्यावी/तपासणी करण्यात यावी.

१) अर्जदार जेव्हा अनुपलब्धता प्रमाणपत्राची मागणी निबंधक, जन्म व मृत्यु यांच्याकडे करतील त्यावेळी त्यांचे राहण्याच्या ठिकाणासंबंधी, जन्मठिकाणा संबंधी कागदपत्र, पुरावा म्हणून प्राप्त करावा.

२) पुरावा म्हणून रेशनकार्ड, शाळा प्रवेशनोंदी, माध्यमिक/उच्चमाध्यमिक प्रमाणपत्र (मार्कशिट) इ. पैकी कोणतीही प्रत.

३) निबंधक, जन्म व मृत्यु यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यापूर्वी अर्जदारांनी मागणी केलेल्या अनुपलब्धता प्रमाणपत्राच्या संदर्भातील, कारणाच्या सत्यतेसंबंधी चौकशी/खात्री करावी.

४) अर्जदार यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्राची मागणी निबंधक, जन्म व मृत्यु यांच्याकडे करतेवेळी जर का वर नमूद बाबीपैकी, पुरावाखातर काहीच सादर केले नाही/असमर्थता दाखविली तर, पोलिस चौकशी/पोलिसामार्फत तपासणी झाल्यानंतरच प्रमाणपत्र देण्यात यावे.

वरील मार्गदर्शक सूचना आपल्या जिल्हयातील सर्व निबंधक, जन्म व मृत्यु (पंचायत समितीचे गटविकास अधिकारी/मुख्याधिकारी नगरपालिका) यांना, व तसेच सर्व तहसिलदार यांना कळविण्यात यावे. व केलेल्या कार्यवाही संबंधी कृपया या कार्यालयास अवगत करावे.

सहपत्र - मा. महानिबंधक, जन्म व मृत्यु, नवी दिल्ली.
यांचे दि. ३१ जानेवारी २००७ चे परिपत्रक.

स्वाक्षरित प्रत

उपसंचालक, आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक, जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) मा.अतिरिक्त सचिव, तथा महानिबंधक, जन्म व मृत्यु, भारत सरकार,गृहमंत्रालय, व्ही.एस.डिव्हीजन, पश्चिम विभाग-१, आर. के. पूरम, नवी दिल्ली -११००६६
२) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु महाराष्ट्र राज्य, मुंबई - ३२ २/- आपले दिनांक २९.७.२०१३ चे पत्रानुसार.
३) मा. महानिबंधक, भारत सरकार, जीवनांक प्रभाग, पश्चिमी खंड-१, रामकृष्ण पुरम, नई दिल्ली ११००६६

प्रत सस्नेह अग्रेषित :- उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ, कार्यालय,............(सर्व)

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.)
पुणे
दिनांक:- 07 AUG 2013
जावक क्रमांक - 8875-8950
सही :

Circular 07

# आरोग्य सेवा संचालनालय

## (महाराष्ट्र राज्य)

सत्यमेव जयते

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१०३१-३६ | Website : http://maha-arogya.gov.in |
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१००६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर ) | २२६११४७१ | Email : miscell@rediffmail.com |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६२०२४९ | Fax No. 022-22620234 (DHS) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | 022- 22679044(Hosp.) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | 022-22622155(CAO) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६७५५ | 022-22703785(Control Room) |
| | | 022-22621047 (NCD) |
| | | 022-22625799(Procurement Cell) |


क्र.संआसे/जन्म मृत्यू प्रमाणपत्र/कक्ष-१८/टि.६/5584 /१३

दिनांक :-२९ /०७/२०१३

प्रति,

उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ)

तथा उपमुख्य निबंधक, (जन्म-मृत्यु)

महाराष्ट्र राज्य पुणे

विषय:- Issue of non-availability Certificate under Section 17 and Corresponding Rule 13(3) of the registration of Births and Deaths (RBD) Act 1969

संदर्भ:- केंद्र शासनाचे पत्र दिनांक ०६/०६/२०१३

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये भारताचे महासंचालक यांनी Non Availability Certificate चे वाटप करण्या संदर्भात आवश्यक त्या सुचना दिनांक ०७ जून २०१३ रोजी परित्रकाव्दारे राज्यांना दिल्या होत्या. परंतू बऱ्याच राज्यात सदर सुचनांची अंमलबजावणी होत नाही.

"Non Availability Certificate" सदर प्रमापणपत्राच्या चुकीच्या वापरास प्रतिबंध होण्याकरीता सोबत जोडलेल्या उपरोक्त दिनांकाच्या परिपत्रकाचे अवलोकन करुन आवश्यक त्या सुचना राज्यातील सर्व जन्म व मृत्यू निबंधकांना देण्यात याव्यात. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास अवगत करावा.

संचालक, आरोग्य सेवा,

मुंबई करिता

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ. मा. जी.आ.)
आवक-जावक 4800
दिनांक :- 02 AUG 2013
शाखा :- ........ कार्य
अधिक्षक :-
प्रशासकीय अधिकारी